Vol 6 Issue 6 Dec 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# विश्वतत्वाचा शोध घेणारी केशवसुतांची सामाजिक कविता

डॉ. प्रवीण बनसोड
मराठी विभाप्रमुख , नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत , जि. यवतमाळ.

## प्रास्ताविक–

केशवसुत यांचा जन्म 15 मार्च 1866 रोजी झाला. केशवसुतांची पहिली उपलब्ध कविता 1885 या वर्षातील आहे. 1888 मध्ये त्यांची कविता प्रथम प्रकाशित झाली. त्यांचा कवितासंग्रह मात्र त्यांच्या मृत्यूनंतर एका तपाने म्हणजे 1917 साली प्रकाशित झाला. केशवसुतांपासून मराठी कवितेचे आधूनिक युग सुरू झाले, असे मानले जाते. त्यांच्या मृत्यूनंतर आजतागायत केशवसुत आणि त्यांची कविता याविषयी विपुल लेखन झाले आहे. केशवसुतांच्या कवितेच्या जन्मकाळानंतर शतक लोटून गेल्यावरसुद्धा त्यांच्या कवितेविषयी चर्चा होत राहते, यामध्येच केशवसुतांचे मोठेपण सामावलेले आहे. त्यांच्या काव्यातील अनेक उक्ती मराठी भाषेत वचनांच्या रूपाने रूढ झालेल्या आहेत. उदा– 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' , 'नरेची केला हिन किती नर', 'नियमन मनुजासाठी – मानव नसे नियमनासाठी', 'देव दानवा नरे निर्मिले', 'प्रौढत्वी निज शैरवास जपणे बाणा कविंचा असे' इ.

केशवसुतांच्या रूपाने एक नवा मानव, जन्माला आला होता. तो भावनापूजक होता, मानवपुजक होता, निसर्गपूजक होता, स्वातंत्र्यपूजक होता, प्रेमपूजक होता, आत्मपूजक होता व काव्याच्या सामर्थ्यावर अपार श्रद्धा ठेवणारा होता. केशवसुतांच्या कवितेने मराठीत क्रांतिरस निर्माण केला, आणि त्यांनीच मराठी कवितेला नवे वळण दिले. 'चतुर्दशपती' किंवा 'सुनीत' (सॉनेट) हा काव्यप्रकार केशवसुतांनीच मराठीत रूढ केला. 'मयुरासन' आणि




'ताजमहल' ही त्यांची कविता म्हणजे मराठीत पहिले स्वतंत्र सुनीत होय. केशवसुतांनी 'झपुर्झा' सारखे शब्द जाणीवपूर्वक निर्माण केले, तर 'मट्ठ' यासारख्या सामान्य व्यवहारातील 'गद्य' शब्दालाही त्यांच्या कवितेने सामावून घेतले.

मराठी कवितेच्या बहिरंगाप्रमाणेच तिचे अंतरंग बदलण्यातही केशवसुतांचा वाटा मोठा होता. केशवसुतांची कविता खऱ्या अर्थाने मराठी कवितेचा आशय आणि घाट या दोन्हीतील बदलांचे आरंभस्थान होते. केशवसुतांच्या कवितेचा आशय म्हणजे बदलत्या सामाजिक अंतःसत्वाचाच उद्गार होता. केशवसुतांच्या आत्मनिष्ठ, स्वातंत्र्यप्रेमी व समाज सुधारणावादी वृत्तीतुन हा आशय निर्माण झाला होता. त्यांची कविता विषयवाचक अथवा वस्तूवाचक नसून वृत्तीवाचक आहे. तिच्यावर तिच्या युगाचा, वातावरणाचा व परिस्थितीचा फार खोल ठसा उमटला आहे, त्यामुळे ती जीवंत वाटते.

केशवसुतांच्या सर्वात अर्थपूर्ण कविता म्हणजे त्यांच्या सामाजिक कविता होत. विशेषतः 'अंत्यजाच्या मुलांचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'मुलास झोडपणाऱ्या एका पंतोजीस', 'रूढि–सृष्टि–कलि?', 'पण लक्षात घेतो कोण'?, 'च्या कर्त्यास', 'तुतारी', 'स्फूर्ती', 'मूर्तिभंजन', 'नवा शिपाई' , 'गोफण केली छान', या कविता तत्कालीन सामाजिक अंतःसत्ताचे निर्देशन करणाऱ्या आहेत. या कवितांमधून केशवसुतांचा सुधारणावाद प्रत्ययास येतो. कविंच्या श्रेष्ठत्वाविषयीच्या विलक्षण आत्मविश्वासामुळे हा सुधारणावाद केशवसुत जोमदारपणे मांडू शकले.

ष्नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे"

असा केशवसुतांचा नवा शिपाई निसर्गवादाने, निसर्गवादी मानवतावादाने, ऐहिक सुधारणावादाने, स्वातंत्र्य–समता–बंधुतेच्या तत्वमयीने प्रभावित झालेला होता. त्यामुळे त्याच्यात एक नवे आत्म–भान, समाज–भान आणि सृष्टी–भान निर्माण झाले होते.

केशवसुतांना 'तुतारी' या कवितेचा आशय मूर्त करतांना एका नव्या सर्जनशील घाटाची गरज भासते. आशयाची आधुनिकता, वैचारीक प्रखरता, भविष्याची आश्वासकता या सर्वांचा मेळ 'तुतारी' च्या गगनभेदी ललकारीत स्पष्टपणे जाणवतो.

केशवसूत 'स्फूर्ति' या कवितेत म्हणतात –

"पद्यपक्तिची तर आमूच्या करी विधीने दिली असे,
टेकूनी ती जनताशीर्षावरी जग उलथूनिया देऊ कसे।"

पद्यपंक्तिच्या तरफेने जग उलथून देण्याची अमानवी ताकद आमच्यात आहे, असे सांगतात, त्यांची 'आम्ही कोण?' या कवितेच्या शेवटी केशवसुत 'आमच्या अभावी सारे विश्व आणि जीवन व्यर्थ बनेल' असे सांगतात.

'धूमकेतु आणि महाकवि' या कवितेत केशवसुत सांगतात की, 'महाकवि जगातील महाक्रांतीचे भविष्य सांगण्यासाठी आणि ते लोकांना गायला लावण्यासाठी येतात'. कविता ही एक शक्ती असल्याची जाणीव केशवसुतांच्या काव्यातून प्रतीत होते.

केशवसुतांच्या आत्मविश्वासा–प्रमाणेच त्यांच्या परखड आणि विद्रोही वृत्तीमुळे त्यांची सामाजिक कविता विशेष प्रभावी बनली. पारंपारीक मूल्यव्यवस्थे–विरूध्द केशवसुतांनी विद्रोह मांडला. केशवसुतापूर्वी कुणाही कवीने अशा भंजनाचा उच्चार केला नाही. तर त्या व्यवस्थेच्या भंजनाचाच प्रचार केला. म्हणुन केशवसुत हे मराठी कवितेत आदिविद्रोही कवी ठरतात.

"मूर्ती फोडूनिया देऊ जोडूनीया,
परी विकूनिया टाकू न त्या"

अशी 'मूर्तिभंजन' मध्ये केशवसुत

रोकठोक भूमिका मांडतात. 'मूर्तिभंजन' ही कविता म्हणजे केशवसुतांच्या भूमिकेचा महत्वपूर्ण उद्‌गार म्हटला पाहिजे.
नवनिर्मितीसाठी जुन्याची मोडतोड आवश्यक असते. परंपरेवर आघात करावे लागतात. काही मूल्ये त्याज्य ठरवावी लागतात. उर्वरित मूल्यांचा नव्या मूल्यांशी मेळ घालून मूल्यांचा नवा प्राधान्यक्रम प्रस्थापित करावा लागतो. याचा प्रत्यय केशवसुत 'मूर्तिभंजन' च्या रुपाने घडवितात.

केशवसुतांची कविता एक उदासरम्य अशी भावकथा साकार करते. ही भावकथा आहे स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या प्रेमाची, त्यांच्या जुळलेल्या आणि तुटलेल्या जीवीत धाग्यांची.

"कल्लोळाच्या क्षोभे गर्जत आहे,
त्या सागरतीरी उभा गडे! मी आहे"

केशवसुत हे युगकवी होते. महाराष्ट्राच्या दीर्घ इतिहासातील एका संक्रमणकाळाच्या सीमेवर ते उभे होते. दोन युगांच्या संगमावर ते उभे होते. एक युग होते जीर्ण झालेल्या, ऱ्हास पावणाऱ्या संरजामशाहीचे, तर दुसरे उदयाला येणाऱ्या भांडवलशाहीचे. केशवसुतांची कविता म्हणजे या युगसंगमावर उभे राहून अनुभवलेली भाव—विचारांची आंदोलन, पाहिलेली स्वप्ने आणि भोगलेल्या वेदना याचे मूर्तिमंत उदाहरण.

केशवसुतांच्या कवितेला महाराष्ट्राच्या प्रबोधनाची, ब्रिटीशांनी आणलेल्या पाश्चात्य संस्कृतीची पार्श्वभूमी आहे. केशवसुतांची 'तुतारी' ही कविता जुने आणि नवे, भूत आणि भविष्य, सरंजामी व भांडवली या दोन वेडांनी गुंफलेली कविता आहे —

"अवडम्बरली ढगे कितीतरी,
रविकिरणाचा चूर होतसे,
मोहर सगळा गळूनि जातसे,
कीड पिकावरी सर्वत्र दिसे!"

मध्ययुगातील काळ्या ढगांनी विकासरुपी रविकिरणांना अडविले आहे, असा आशय केशवसुतांनी तुतारीतुन व्यक्त केला आहे. जुन्या रूढी, परंपरा यांच्याविरोधात कवीची लेखणी अत्यंत धारदार बनते —

"जुने जाऊ द्या मरणालागुनि,
जाळनि किंवा पुरूनी टाका,
सडत न एक्या ठायी ठाका...!!
असा अत्यंत स्फूर्तिदायक संदेश देतात —
प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा,
निजनामे त्यावरती नोंदा"

सनातनी आणि सुधारणावादी, प्रतिगामी आणि पुरोगामी, वर्णवर्चस्वादी आणि लोकशाहीवादी अशा प्रवृत्तीचा संघर्ष हा तुतारीचा प्राण आहे. मध्ययुगीन संरजामशाहीतील जीवनमार्गाचे हे प्रतीक आहे. केशवसुत हा जीवनमार्ग नाकारतात —

"नियम मजुजासाठी, मानव
नसे नियमनासाठी जाणा,
प्रगतीस जर ते हाणी टोणा,
झुगारूनि ते देऊनि बाणा.."
किंवा,
"घातक भलत्या प्रतिबंधावर
हल्ला नेण्या करा त्वरा रे
उन्नतीचा ध्वज उंच धरा रे!"

ध्वज उंच धरण्याचा आग्रह करून मानवाच्या मदतीसाठी चालण्याचे आवाहन केशवसुत करतात —

चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या समाजव्यवस्थेने जातिव्यवस्था, अस्पृश्यता व स्त्रीदास्याला जन्म दिला. मनूने तर स्त्री स्वातंत्र्यास अपात्र असल्याचे जाहीर केले, पण स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे, ती समाजाचे अर्धे अंग आहे, असे मानुन केशवसुतांनी स्त्रीयांच्या उध्दारासाठी झटणाऱ्या सर्वांचा गौरव केला —

"धीरा! उन्नतिचे पथात उमदा राऊत तु चालासी!
नाही काय? करूनि चीत अगदी ही रूढिकाराक्षसी,
टाकाने अपुल्या दुराग्रह जुना मर्मी तसा विंधूनी,
स्त्रीजातीत असाच काढ वरती! घे किर्ति संपादुनी!"

असे नमुद करून, सृष्टितत्वाने दिलेली ज्ञान, सौंदर्य आणि प्रेम ही दिव्य जीवनमूल्ये घेऊन पृथ्वीवरच्या सर्व देशातील मानवांना वाटण्यास

केशवसुतांचा 'नवा शिपाई' सिध्द झाला आहे.

"ती माझी, मी त्याचा – एकच ओघ अम्हातुनि वाहे!
नव्या मनुतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे!"

अशी मानवातील आंतरिक ऐक्याची प्रतिती आलेला हा नवा शिपाई 'मी' राहत नाही, तो विश्वमय होतो, केवळ मानवांशीच नव्हे तर सृष्टितत्वाशीच आपण निगडित आहोत, अशी जाणीव त्याला होते –

"तो मज गमले विभूति माझी स्फुरत पसरली विश्वामाजी
दिक्कालासही अतीत झालो, उगमी विलयी अनत ठरलो."

ज्या भेदांनी, विषमतेच्या तटबंधांनी मानव सृष्टिपासून दुरावला आहे त्या तोडून सृष्टितत्वांशी एकरूप होता येईल, असा विश्वास वाटू लागतो –

"शान्तीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे!"

केशवसुतांच्या काव्यविषयक कवितांमधून कवी आणि समाज यांच्यातील पाशांचे स्वरूप अधिक स्पष्ट होतांना दिसते. 'कवितेचे प्रयोजन' या कवितेत ते म्हणतात –

"गाण्याने कविचा प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेईल,
स्फूर्तिचा तुमच्या पिढ्यास पुढल्या साक्षी कवी होईल!"

केशवसुतांनी समाजाशी बांधिलकी स्वीकारल्याबरोबर त्यांची कविता ही एका विशिष्ट अर्थाने उपयुक्तावादी बनतांना दिसते. केशवसुतांचा कवी हा समाजाला रूप देणारा, त्याला विकासाची स्वप्ने आणि ध्येये देणारा, त्याच्या भावी स्थितीगतीचे भविष्य सांगणारा एक द्रष्टा नेता आणि एक निर्माता आहे. केशवसुतांनी कवीच्या रूपात एक अतिमानव पाहिला.

पृथ्वीला नवे, चिरतरूण रूप देण्यासाठी स्वर्गाचे स्वप्न उराषी बाळगणारे केशवसुत विश्वाच्या, विश्वातील सर्व प्रकारच्या निर्मितीमागील बीजतत्वाचा शोध घेऊ पाहतात. विशेषतः नव्या समाजाच्या निर्मितीसाठी नवे सामाजिक भान निर्माण झाले पाहिजे, अशी जाणीव केशवसुतांच्या कवितांनी निर्माण केली.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org